कार्यालय परिपत्रक क्र. ३६-

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
प्रशासन विभाग,
दिनांक : ०१/०२/२०२२

सर्व विभागप्रमुख,
यांजकडेस.......

विषय :- महामंडळाच्या व्यवहारात राजभाषा मराठीचा शंभर टक्के वापर करणेबाबत.
संदर्भ :- १.महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग परिपत्रक क्र.मभावा-२०१०९/प्र.क्र.२२/भाषा-२, मुंबई, दि.२९/०६/२०२०
२. मा.नितीन शशिकांत यादव, संस्थापक/अध्यक्ष, जागृत नागरिक महासंघ यांचे दि.१८/१२/२०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांकित अनुसरून संदर्भाकिंत शासन आदेशानुसार पुणे महानगर परिवहन महामंडळातील सर्व विभागांना कळविण्यात येते की, प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यात यावा. सर्व पत्रव्यवहार, कार्यालयातील कामकाज, सर्वसामान्यांपर्यंत जाणारे सर्व नमुने, पत्रके, परवाने, नोंदवहया, प्रमाण नमुने, प्रपत्रे, विभागीय नियम पुस्तिका, सर्व प्रकारच्या टिपण्या, नसत्या, शेरे, अभिप्राय, आदेश, अधिसुचना, प्रारुप नियम, कार्यालय परिपत्रके, करारनामे, अहवाल, बैठकांची इतिवृत्त, इत्यादी मराठी भाषेमध्ये करणे आवश्यक आहे. तसेच कार्यालयातील नामफलकावर एखादी व्यक्ती/अधिकारी/कर्मचारी/याचें नाव मराठी भाषेमध्ये असणे आवश्यक आहे. कार्यालयीन नामफलकांवर एखादी व्यक्ती/अधिकारी/कर्मचारी/यांचे नाव मराठी भाषेत लिहिताना इंग्रजी अद्याक्षरांचे भाषांतर न करता मराठीतूनच लिहावे. उदा. (एच.एन.पोळ ऐवजी ह. ना.पोळ असे असावे) तसेच कार्यालयातील निविदा, ठेकेदारांशी केलेले करार/वेगवेगळया कंपन्या/आस्थापनांशी केलेले करार/इंग्रजीत केले जातात. सदर करार इंग्रजीमध्ये असल्याने ते सर्वसामान्यांना समजत नाहीत त्यामुळे राजभाषा अधिनियम १९६४ नुसार हे सर्व करार मराठीतून करावे किंवा कराराची कमीत कमी एक प्रत मराठीत करणे कायद्याने बंधनकारक आहे.

तरी संदर्भीय शासन आदेशानुसार महामंडळातील सर्व खातेप्रमुख व विभागप्रमुख यांनी दिलेल्या सुचनांनुसार मराठीतून कामकाज करावे.

(डॉ.चेतना केरुरे)
सहव्यवस्थापकीय संचालक,
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

सोबत : संदर्भांकित दि.२९/०६/२०२० चा शासन आदेश

प्रती - सर्व खातेप्रमुख / विभागप्रमुख,
नोटीसबोर्ड

मा. आयटी विभाग -
सदरची प्रत महामंडळाचे वेबसाईटवर प्रसिद्ध करणे

डेप्युटी चिफ मॅनेजर (ॲडमिन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.